
# अरुणोदय

२०१७-१८

## श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव रेल्वे

### पदवी आणि पदव्युत्तर



Website : www.shrirammmv.org,
E-mail : Shrirammmv2000@gmail.com

# संपादकीय ...

''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्ने करु ।।
शब्दची आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्दे वाटू धन जनलोका ।।''

जगद्गुरु तुकोबांच्या या अभंगानुसार शब्द धनाने समृध्द असलेला आमच्या महाविद्यालयाचा सत्र २०१७–१८ चा 'अरुणोदय' हा वार्षिकांक वाचकांच्या हाती देत असतांना अगदी मनस्वी आनंद होत आहे. त्याचे कारण असे की,

महाविद्यालयीन वय हे अगदी सळसळत्या तरुणाईचे असते. आणि त्यामध्येच कुठेतरी दडलेली असते सृजनशिलता, नवनिर्माणशिलता आणि याच काळात विद्यार्थी हे भावी जीवनाची वाटचाल करीत असतात आणि हे सर्व करीत असतांना त्यांच्या मनामध्ये अनेक गोष्टीची, अनुभवांची साठवण होत असते. परंतु त्याचे प्रगटीकरण करण्यासाठी, त्यांच्या मनातील स्पंदन टिपण्यासाठी आवश्यकता असते ती व्यासपीठाची आणि हे व्यासपीठ वार्षिकांकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळत असते.

खरं म्हणजे आमच्या विद्यार्थीनी ह्या बहुतेक ग्रामीण भागातील असल्यामुळे आकाशामध्ये उत्तुंग भरारी घेण्याचे स्वप्न उराशी बाळगूणच त्या महाविद्यालयामध्ये प्रवेश करीत असतात. तेव्हा त्यांच्या मध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा. तसेच त्यांच्यामध्ये असलेला भावी नागरिक तसेच सृजनशील असा साहित्यिक जागृत व्हावा हाच 'अरुणोदय' चा प्रयत्न आहे.

खरं म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये एक साहित्यिक दडलेला असतो. तेव्हा त्यांना प्रोत्साहित करुन त्यांच्या मधील लेखन क्षमता जागृत करण्याचे त्यांचे भावविश्व उलगडण्याचे कार्य खऱ्या अर्थाने वार्षिकांक करीत असतो.

तसेच समाजात वावरत असतांना शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असते. तेव्हा येणाऱ्या

प्रत्येक अडचणींवर मात करण्याची हिंमत त्यांच्यामध्ये यावी हा या मागचा उद्देश आहे. आणि ही हिंमत निर्माण करण्याची ताकद साहित्यामध्ये आहे हे निश्चित.

आमच्या विद्यार्थीनींनी खूप सुंदर असे लेख, कविता, चारोळ्या म्हणजे एकूणच जे साहित्य लिहिलेले आहे. त्यातून त्यांच्या विचारांच्या प्रगल्भतेचा परिचय होतो. आणि आमच्याकडे आलेला साहित्याचा ओघ पाहून आम्हाला खरोखरच खूप आनंद झाला. म्हणजेच मुलींना सामाजिक, आर्थिक व राजकिय घडामोडींची जाणीव आहे हे यावरुन स्पष्ट होते. आणि यावरुन भावी जीवनात त्या उत्कृष्ट अशा लेखिका किंवा कवयित्री होवू शकतात यात तिळमात्रही शंका नाही.

'अरुणोदय' मध्ये केवळ विद्यार्थीनीचे साहित्यच प्रकाशित झालेले नसून त्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेले यश तसेच विविध विषयांच्या अहवालाचा समावेश देखील करण्यात आलेला आहे.

या वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी आम्हाला अनेकांचे सहकार्य लाभले. त्यामध्ये प्रामुख्याने आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश टाले सर जे स्वत: देखील एक अभ्यासू साहित्यिक असल्यामुळे त्यांनी आम्हाला वेळोवेळी मौखीक असे मार्गदर्शक केले. त्यामुळेच आम्ही हा अरुणोदय प्रकाशित प्रकाशित करु शकलो. त्यामुळे आम्ही सरांचे खूप ऋणी आहोत. तसेच संपादक मंडळातील सर्व सदस्यमंडळी व आमच्या सृजनशील मनाच्या विद्यार्थीनी यांच्या सहकार्याशिवाय आम्ही हा अंक प्रकाशित करुच शकलो नसतो. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व जय कॉम्प्युटर्स व श्याम प्रिंटर्स यांचे सहकार्य देखील तेवढेच मोलाचे आहे. त्यामूळे त्यांचे देखील मन:पूर्वक आभार.

सरते शेवटी आमचा हा वार्षिकांक विद्यार्थ्यांना दिपस्तंभा सारखा मार्गदर्शक ठरेल अशी आशा बाळगतो. आणि तो आपणा समक्ष सादर करतो.

***धन्यवाद !***

– संपादक मंडळ



## ✲ आमचे प्रेरणास्थान ✲



**मा. श्री. अरुणभाऊ अडसड**
अध्यक्ष, श्रीराम शिक्षण संस्था, धामणगांव रेल्वे

## * आमचे मार्गदर्शक *



**मा. श्री. घनश्यामजी मेश्राम**
सचिव, श्रीराम शिक्षण संस्था,
धामणगाव रेल्वे



**मा. श्री. अशोकभाऊ पनपालीया**
अध्यक्ष, स्था. व्य. स. श्रीराम कला
महिला महाविद्यालय, धा.रे.

# प्राचार्यांच्या लेखनीतून ...



आपल्या महाविद्यालयाचा सत्र २०१७-२०१८ चा वार्षिकांक 'अरुणोदय' आपल्या हातात देतांना मनस्वी आनंद होत आहे. गेल्या १८ वर्षातील 'अरुणोदय' ची वाटचाल अतिशय उल्लेखनीय आहे. हे वर्ष माझ्यासाठी सुध्दा महत्वाचे आहे. माझ्याच महाविद्यालयात नियमीत प्राचार्य म्हणून माझी झालेली निवड ही माझ्यासाठी फारच गौरवाची बाबा आहे. महाविद्यालयाकडे सिंहावलोकन करुन बघताना असे वाटते की, गेल्या अठरा वर्षात अनेक टप्पे पार करित बरीच उंची गाठलेली आहे. अनेक आव्हाने समोर आहेत. परंतु संस्थेचे अध्यक्ष आदरणीय अरुणभाऊ अडसड, सर्व पदाधिकारी यांनी टाकलेली जबाबदारी लीलया आपण पेलू शकू हा आत्मविश्वासही आहेच.

आपला देश आज अनेक स्थित्यंतरातून जात आहे. अनेक सामाजिक समस्यांनी समाजाची अवस्था दयनीय होत आहे. महिलांवर बलात्कार, खून होताना मन सून्न होऊन जाते. रोजचे वर्तमानपत्र उघडले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्तेची बातमी कानावर पडते. या सर्व घडामोडींचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी हे सर्व आपापल्या परीने टिपण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे निश्चितच गौरवास्पद आहे. आणि 'अरुणोदय' महत्वाची भूमिका निभावत आला आहे. आजपर्यंतचा समाजाचा इतिहास पाहिल्यास असे दिसून येते की, समाजाच्या कोणत्याही क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य केवळ तरुणाईतच असते. जगभरातील सर्व क्रांत्या घडवून आणण्यात तरुणाईने महत्वाची भूमिका बजावली आहे. ज्या देशाजवळ या तरुणाईचे सामर्थ्य असते त्या देशाची भरभराट होण्यास वेळ लागत नाही.

फक्त गरज असते ह्या शक्तीचा मोठा वापर करुन घेण्याची. आपल्या देशामध्ये येणाऱ्या काळात संपूर्ण जगातील राष्ट्रांच्या तुलनेत तरुणांची संख्या जास्त असेल. अर्थातच कमावणाऱ्या लोकांची संख्या वाढून अवलंबीतांची संख्या कमी होईल. म्हणजेच देशाची महासत्तेकडे वाटचाल सुरु झालेली आहे. यावेळी तरुणांना, त्यांच्या शक्तीला, विचारांना चालना देण्याचा आम्ही 'अरुणोदय' च्या माध्यमातून अल्पसा प्रयत्न करीत आहो. त्यांच्या पंखांना बळ देऊन अवकाशात मुक्त संचार करण्याकरीता प्रेरणा देण्याचे कार्य 'अरुणोदय' करीत आला आहे. यानंतर ही 'अरुणोदय' नवोदितांना प्रकाशमान करुन त्यांची प्रतिभा वृध्दिंगत करण्याचा सातत्याने प्रयत्न करेल यात मुळीच शंका नाही.

आपल्या देशाचे माजी पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी यांची कविता या निमित्ताने मला आठवते.

"बाधाएं आती हैं आएं
घिरे प्रलय की घोर घटाएं
पावों के नीचे अंगारे,
सिर पर बरसे यदि ज्वालाएं
निज हाथों में हंसते-हंसते,
आग लगाकर जलना होगा।
कदम मिलाकर चलना होगा।"

सर्वांनी सोबत राहून, एकमेकांना सोबत घेऊनच आपल्याला देशाची प्रगती करता येईल. एवढेच या निमित्ताने वाटते.

या वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वेचे अध्यक्ष मा. अरुणभाऊ अडसड, सचिव मा. घनश्यामजी मेश्राम, स्था.व्य.स. अध्यक्ष, मा. अशोकभाऊ पनपालीया, मा. प्रतापदादा अडसड, संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचेही मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. संपादक मंडळ, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थीनी आणि पालक यांचा वार्षिकांकाच्या निर्मीतीत मोलाचा वाटा आहे. वार्षिकांकास माझ्या शुभेच्छा !

– प्राचार्य डॉ. गणेश क. टाले



◆◆◆◆◆

✲ मार्गदर्शक ✲

प्राचार्य डॉ. गणेश टाले

प्रा. नितीन बिहाडे  प्रा. नंदकिशोर राऊत

प्रा. राजेश आडे  प्रा. सुवर्णा घोंघे

✲ संपादक मंडळ ✲

कु. पुनम ठाकरे  
मराठी विभाग

कु. समिक्षा बुटले  
इंग्रजी विभाग

कु. मयुरी निमकर  
हिन्दी विभाग

✲ मुखपृष्ठ संकल्पना ✲

कु. आरती महल्ले  
बी.ए. भाग-२

✲ प्रकाशक ✲

प्राचार्य, श्रीराम कला महिला महा. धामणगाव रेल्वे

✲ अक्षर जुळवणी ✲

जय काम्प्यूटर्स  
नगर परिषद जवळ, धामणगाव रेल्वे, मोबा. नं. ९४२२९१४३३०

✲ मुद्रक ✲

श्याम प्रिंटर्स, रेल्वे गेटजवळ, धामणगाव रेल्वे  
फोन नं. २३७३११ मोबा नं. ९८९०७३७१७८, ९४२३४२५४०४

ह्या वार्षिकांकातील विचार आणि मते प्रत्येक लेखकाची वैयक्तीक असून प्रकाशक आणि महाविद्यालय त्यांचेशी सहमत असेलच असे नाही.



✲ यशाचे मानकरी ✲



कु. समिक्षा बुटले  
(बी.ए. भाग-१)  
[illegible]  
विद्यापीठ स्तरीय



कु. नेहा [illegible]  
(बी.ए. भाग-१)  
ईन्द्रधनिल आंतर विद्यापीठ  
[illegible] उत्कृष्ट खेळाडू



कु. [illegible]  
(बी.ए. भाग-३)  
[illegible]



कु. [illegible]  
(बी.ए. भाग-३)  
विद्यापीठ प्रतिनिधी



कु. प्रतिक्षा थोटे  
(बी.ए. भाग-३)  
उत्कृष्ट वाचक  
पारितोषीक विजेती





कु. [illegible]  
(बी.ए. भाग-१)  
सांस्कृतिक प्रतिनिधी



# ✻ संपादक मंडळ ✻


डॉ. गणेश टाले


प्रा. नितीन बिहाडे


प्रा. नंदकिशोर राऊत


प्रा. राजेश आडे


प्रा. सुवर्णा घोपे


कु. मयुरी निमकर


कु. समिक्षा बुटले


कु. पुनम ठाकरे



# ✻ महाविद्यालयीन कर्मचारी ✻



अनुक्रमे : प्राचार्य डॉ. गणेश टाले, प्रा. मोनाली इंगळे, प्रा. नंदकिशोर राऊत, प्रा. अभिजीत दोड, प्रा. नितीन बिहाडे, प्रा. राजेश आडे, प्रा. सुधीर पाथरे, प्रा. योगेश काशिकर, डॉ. निता केणे, प्रा. सुवर्णा घोपे, अजय कुळकर्णी, राजेश भैय्या, राजेश मारवे, नागोराव पंचबुध्दे, संतोष शिसोदे, कल्पना चव्हान, शरद गवारले, प्रफुल कांबळे

## अंतरंग

### ■ मराठी विभाग ■

लेख/ कविता इतर :



स्त्री आज काल आणि उद्या / मन जेव्हा प्रेमात असतं / अगं अगं सुनबाई / संतांचे विचार / कवी, साहित्यिक व त्यांची टोपण नावे / चारोळी / कन्यादान / जीवन जगतांना / दुष्काळ/ जुगार / विचार / शिवबा / आईचे सौभाग्य / माय / उमलु द्या त्या कळीला / बाप/ सावित्रीची गौरव गाथा / दोन शब्द जगण्यासाठी / अनाथ / काहूं / चारोळी / माझा महाराष्ट्र/ त्याला रडवते भाकर / लोकशाही / माझी माय / अर्जुनाचा श्रीकृष्णाला प्रश्न / हे असं कसं चालणारं / आयुष्याला द्यावे उत्तर / बाबा / साद आईची / मैत्री म्हणजे काय / स्वप्नच हरवून बसलो / माझी माय / मोईल येड / प्रेम / नशीब / हास्य / सुविचार / धोके / शायरी / चारोळी



### ■ हिंदी विभाग ■

लेख/ कविता/ इतर :



बेटियाँ / माँ / भारत का नवनिर्माण / अच्छे दिन आ जायेंगे / दिल कही और ओ लगा बैठे/ दस मोती ज्ञान के/ अनमोल वचन / बाबासाहेब / शेरो शायरी / एस.एम.एस./अनमोल वचन/ दोस्ती / कन्यादान

### ■ English Section ■

ARTICAL, POETRY & OTHER :



Unity is Strength / Friendsships / Importance of Forest / The Way of Life / Sant Gadge Baba Hero in our India / Examination / One to Ten it is Main / Success / Sayari / Life is... / A Fairy Song

### ■ अहवाल विभाग ■

अहवालाचे नांव :



राष्ट्रीय सेवा योजना अहवाल -२०१७-१८/ ग्रंथालय अहवाल २०१७-१८ / शारीरिक शिक्षण व रंजन विभाग वार्षिक अहवाल २०१७-१८ / सांस्कृतिक अहवाल - २०१७-१८ / भौगोलिक सहल अहवाल २०१७-२०१८.



# मराठी विभाग



# स्त्री आज काल आणि उद्या

प्राचीन काळी भारत स्त्री प्रधान देश होता. शेतीचा शोध सुध्दा स्त्रानेच लावला त्यावेळी कुटुंब प्रमुख म्हणून तीला मानाचे स्थान होते. त्यावेळी नवरा नवरीकडे नांदायला जात असे. कालांतराने परकीयांनी येथील मुळ निवासस्थानावर अक्रमण केल्यानंतर येथील आदिवासी यांना पराभव पत्करावा लागला. कारण आर्याकडे तिक्ष्ण धारदार धातुचे हत्यार व घोडे होते. तसेच आर्य दिसायला गोरे गोमटे व चाणाक्ष बुध्दीचे त्यांनी त्यांच्या कपट नितीने येथील मुळनिवासस्थानावर त्यांची संस्कृती लादली व मानसिकरित्या येथील लोकांना गुलाम केले. स्त्रीला नखापासून ते केसापर्यंत विविध शृंगारीक बंधनात अडकवून स्त्री फक्त पुरुषाची सर्व प्रकारच्या मानसिक शारिरीक उपयोगाची वस्तु म्हणून तीच्या मनावर बिंबवण्यात आले. त्यातूनच देवदासी, सती, मुरंली, वारांगणा इत्यादी प्रथा तमाम भारतीयांच्या समाजात रुढ झाल्या. या अंधश्रध्दायुक्त प्रथा तमाम भारतीयांच्या मनात इतक्या खोलवर रुजविल्या की हजारो वर्षाच्या कालांतरा नंतर देखील कुप्रथा आजच्या वैज्ञानिक युगात लोकांच्या मनात रुजलेल्या आहेत. जसे चित्रपट, नाटक, मालिका, प्रिंट मिडीया, इंटरनेट इत्यादीच्या माध्यमातून स्त्रीला पुन्हा सालचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी सज्ज झाले आहेत आणि त्यांच्यात सहभागी होऊन स्त्रीया त्यांना प्रोत्साहन देत आहेत. म्हणून माझी सर्व महिलांना विनंती आहे की, त्यांनी टि.व्ही. वर दाखविल्या जाणाऱ्या ओजारणाऱ्या गोजारणाऱ्या अंधश्रध्दावादी मालिका पाहू नये कुण्या ढोंगी साधु बाबांच्या नादी लागु नये जास्तीत जास्त शिकावे, मुलींना शिकवावे पुरोगामी, विज्ञानवादी, विचारसारणी समोर ठेऊन आपल्या भारत देशाला अंधश्रध्दामुक्त देश बनविण्याकरता सहकार्य करावे व स्त्रीने पुरोगामी चळवळीत हातभार लावून बहुजन हिताचे कार्य करावे.

महाराष्ट्रातील कोणत्याही कानाकोपऱ्यातील स्त्री ''चूल आणि मूल'' संकल्पनेतून मुक्त झाली. आहे का ? याच उत्तर ग्रामीण आणि शहरी भागात थोड्या फार फरकाने वेगळे आहे. पुरुष वर्ग, समाज आणि निसर्गाने 'स्त्री' वर दिलेल्या जबाबदाऱ्या याचा विचार केला तर स्त्री मुक्त झालेली नाही. उलट तिची जबाबदारी आणि तिचे काम वाढले आहे. नोकरी आणि घरची जबाबदारी पार पाडतांना पगार नसलेला ओव्हर टाईम स्त्री सध्या करत आहे. मात्र एक आहे की, त्या बदल्यात तिला 'आई' या गोड शब्दाचे प्रेम मिळते. पूर्वी स्त्री म्हणजे घर आणि चूल इतकेच मर्यादित विश्व होते. परंतु हळूहळू हे चित्र बदलले स्त्री शिकली, सवरली स्वत:ला ओळखायला लागली. उंबरठ्याबाहेर पडली आज असे एकही क्षेत्र नाही की जिथे 'स्त्री' चा वावर नाही. पण 'पण' या शब्दानंतर खरी कहाणी सुरु होते. तिचं रुप बदललं खर परंतु एक गोष्ट बदलत नाही ती म्हणजे 'चुल आणि मुल' तिच्यासोबत तशीच चाल आलेली आहे. स्वत:चं करीयर घडवितांना घर आणि करिअर अशी दुहेरी भूमिका तिला करावी लागते. थकलेला जीव अंथरुणावर टाकावा तर दुसऱ्या दिवशीच्या कामाची घोडदौड डोक्यात सुरुच असते. असं हे स्त्रीचं धावपळीच जगणं स्त्री आर्थिकदृष्या स्वावलंबी झाली. प्रत्येक क्षेत्रात स्वत:ची तिने ओळख निर्माण केली. पण 'चूल आणि मूल' ही सोनसाखळी काही तिला काढता आलेली नाही. अपवाद म्हणून काही स्त्रियांच्या बाबतीत असेलही.



आज स्त्री घराबाहेर पडल्याने तिचे अनुभव विश्व समृध्द झाले. पण तिला घर चालविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. आजच्या स्त्रीची ताकद जबरदस्त वाढली आहे. ती शिक्षण घेते, विविध प्रकारची नोकरी करते पण अजूनही घराची जबाबदारी मात्र तीच उचलते शिवाय मुलांचा अभ्यास, त्यांच्या भवितव्याची जडणघडण यांचा भारही स्त्रीने स्वत:वरच घेतला आहे. स्त्रीला आपण घराकडे लक्ष देऊ शकत नाही. याबद्दल अपराधीपणाची भावना असते. या उद्य विचाराला पुरुष साथ देईल का ? प्रश्नच आहे. खरे तर घर दोघांचे असते. बालसंगोपण असो किंवा घरातील कोणतीही जबाबदारी असो, त्यासाठी स्त्रीलाच गृहित धरले जाते. जर घर संसार नोकरी हे दोघांचे असते तर जबाबदाऱ्या या पार पाडताना दोघांचाही सहभाग हवा पण तसे घडत नाही. दोघही नोकरी करुन आले की आई चुली जवळ आणि पुरुष पेपर वाचतात, असे बऱ्याचवेळा दृश्य पहायला मिळते. घरासाठी, मुलांसाठी अनेकवेळा स्त्री साऱ्या जबाबदाऱ्या सांभाळते, एवढेच नव्हे तर घरातील धुनी-भांडी करुन घडाळ्याच्या काट्याप्रमाणे प्रत्येक सेकांदाला महत्व देऊन कामे आटोपून कामावर जाण्यासाठी बाहेर पडणारी स्त्री प्रवास करीत असताना बसच्या व रेल्वेच्या धक्काबुक्कीच्या प्रवासात तिला थकवा आलेला असतो आणि त्यातच धापा टाकत कार्यालय गाठते. एवढे सर्व करुन दमून-भागून गेलेल्या स्त्रीला थोडा उशीर झाला की वरिष्ठांच्या बोलण्या खाव्या लागतात. म्हणजेच स्त्रीयांना बाहेर सुध्दा व व घरीसुध्दा अपमान सहन करावा लागतो.

अनेक काळापासून स्त्री आणि पुरुष यांची कामे घर कुटुंब-समाज मध्ये ठरवून दिली गेली आहेत. पुरुषाने संरक्षण करावे, अन्न मिळवून आणावे, स्त्रीने घर, मुले सांभाळावीत तसेच अन्न शिजवून वाढावे, रांधा-वाढा-उष्टी काढा ही म्हण खरोखरच वाखणण्याजोगी आहे. स्त्रीला हे करावेच लागते. 'स्त्री' वर निसर्गाने सोपवलेले एक नितांत सुंदर काम म्हणजे प्रजनन ! अनेक वेदनामधून जन्माला आलेलं गोंडस बाळ, जन्मांतर बाळाशी असणारी स्त्री ची शरिरीक, भावनीक, मानसीक गुंतवणुक इतकी प्रचंड असते की स्त्री स्वतंत्र झाली असे तिला व समाजाला वाटते. पण तो विचार फक्त भ्रम असतो. तसेच आजच्या काळात दोघांनी नोकरी करणे गरजेचे आहे. यात शंका नाही. स्त्रीला चूलीजवळ कामे करावीच लागतात. स्त्रीच्या बाबतीत रोज मरे त्याला कोण रडे अशी अवस्था झाली आहे. आठवड्याच्या एकमेव सुट्टीला घरातील सर्वजन मग मुले आणि नवरा दोघांकडून अपेक्षा ठेवल्या जातात. त्या स्त्रीची ती आठवड्याची एक सुट्टी आहे. याचा विचार केला जात नाही. रोज आठवड्याभरात तेच जेवण खावून कंटाळा आलाय ! आज सुट्टी आहे ! छान काहीतरी खायला वेगळे कर ! अशी फरमाईश केली. जाते खरचं स्त्रीची शारिरीक आणि मानसिक दृष्ट्या 'चूल आणि मुल' यातून आजही सुटका झालेली नाही आणि होवू ही शकणार नाही. एवढे सगळे पेलण्याची प्रचंड क्षमता आजच्या स्त्री मध्ये आहे. हे तिचे स्थान तीने समाजाला दाखवून दिले आहे.



कु. मोहिनी चव्हान
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆

# मन जेव्हा प्रेमात असतं

हिरवं हिरवं पान असतं
हलतं झुलतं रान असतं
किती किती छान असतं
मन जेव्हा प्रेमात असतं
हळु हळु कळुन येतं
खुळ खुळ प्रेम असतं
कधी कुठं कोण कसं
पडेल काही नेम नसतं
जग सारं म्हणु लागते
तीच त्याचं लफडं आहे
त्यांना कुठं ठाऊक असतं
त्यांच जग वेगळं आहे
कसं कसं काळीज हळु
धस्स धस्स होऊ लागतं
बघता बघता सगळीकडे
प्रेमगीत गाऊ लागतं
चंद्र चंद्र चांदणी चांदणी
म्हणता म्हणता आपलं होतं
त्याच्या तिच्या खोड्यांनाही
जिवापाड जपलं जातं.



कु. प्रतिक्षा थोटे
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆

# अगं अगं सुनबाई

पाया पडते सुनबाई बंद कर तुझी चाल
पहिल तुझं व्हॉटसअॅप चुलीमंदी घाल
रोज नवे नवे ड्रेस नवे काढतीस फोटू
रडून रडून उपाशीच झोपून जातो छोटू
डीपी फीपी बदलता बदलता करपून जाते डाळ
पहिल तुझ व्हॉटसअॅप चुलीमंदी घाल.

लगीन झालंय आपलं शहाण्यासारखं वागाव
चार दिसाच सासु साखर, तोंड भरुन बोलाव
आम्ही मरुन गेल्यावर, बस वाजवत टाळ.
पहिल तुझ व्हॉटसअॅप चुलीमंदी घाल.

रोज एक मेनु बनवतेस वाजवतेस झोपाया बारा
पुलाव असतो चांगला, पण त्यात दगड अन गारा
टुनूक टुंग वाजतो टोन, पोरी लक्ष थोड टाळ
पहिल तुझ व्हॉटसअॅप चुलीमंदी घाल.

डोळ्याला लागेल चष्मा, अंगठा होईल बाद
खरंच सांगते सुनबाई, ह्यो चांगला नाय नाद
मान्य हाय दुनिया गेली चंद्रावर
पण मान- मर्यादा पाळ पाया पडते
सुनबाई आता तरी ही गोष्ट पाळ
पहिल तुझ व्हॉटसअॅप चुलीमंदी घाल.



कु. रसिका ठाकरे
(एम. ए., भाग १)

◆◆◆◆◆



# संतांचे विचार

विदर्भ ही संताची पावण भूमी म्हणून ओळखली जाते आणि आपल्या विदर्भातील दोन महान संत ज्यांचे नाव आज आपल्या दोन विद्यापीठांना मिळाले आहेत ते म्हणजे,

**संत गाडगे महाराज विद्यापीठ - अमरावती**

**वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ - नागपूर**

संतांच्या महान कार्यामुळे त्यांचे नाव हे आपल्या विद्यापीठाला मिळाले आहे.

वं. राष्ट्रसंतांनी ''ग्रामगीता'' या ग्रंथात 'अध्याय विसावा', ''महिलोन्नती'' यामधून स्त्री जातीचे महत्व पटवून सांगतीले आहे.

**प्रल्हादाची कयाधु आई, छत्रपतींची जिजाबाई।**
**कौसल्या , देवकी आदी सर्वही, वंदिल्या ग्रंथी ॥**

वं. राष्ट्रसंत म्हणतात स्त्री जातीला कधीही कमी लेखू नये कारण शिवबाला घडविणारी जिजाऊ ही एक स्त्रीच होती हे विसरता येत नाही.

म्हणूनच मला माझ्या महाविद्यालयाबद्दल फार अभिमान वाटतो कारण – आमचे महाविद्यालय हे ''महिला महाविद्यालय'' आहे.

**ज्याला स्त्री आई म्हणून कळली**
**तो जिजाऊचा शिवबा झाला**
**ज्याला स्त्री बहिण म्हणून कळली**
**तो राधेचा श्याम झाला**
**आणि ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली**
**तो सितेचा राम झाला.**

प्रत्येक महान व्यक्तीच्या जीवनात आणि यशात सिंहाचा वाटा आहे, म्हणुनच स्त्री शक्तीला

**''माझा साष्टांग प्रणाम''**

– कु. शितल मेटे
बी.ए., भाग – २

◆◆◆◆◆

# कवी, साहित्यिक व त्यांची टोपण नाव

१) कृष्णाजी केशव दामले – केशवसुत
२) राम गणेश गडकरी – गोविंदाग्रज, बालकराम
३) वि.वा. शिरवाडकर – कुसुमाग्रज
४) त्र्यंबक बापूजी ठोंबरे – बालकवी
५) शंकर केशव कनिटकर – गिरीश
६) प्रल्हाद केशव अत्रे – केशवकुमार
७) आत्माराम रावजी देशपांडे – अनिल
८) दिनकर गंगाधर केळकर – अज्ञातवासी
९) काशिनाथ हरी मोडक – माधवानुज
१०) विनायक जनार्दन करंदीकर – विनायक
११) यशवंत दिनकर पेंढारकर – यशवंत
१२) नारायण सूर्याजीपंत पराडकर – मोरोपंत
१३) दत्तात्रय कोंडेघाटे – दत्त
१४) नारायण मुरलीधर गुप्ते – बी
१५) चिंतामन त्र्यंबक खानोलकर – आरतीप्रभू
१६) शंकर काशिनाथ गर्गे – नाट्य छटाकार दिवाकर
१७) गोपाळ हरी देशमुख – लोकहित वादी
१८) माधव त्र्यंबक पटवर्धन – माधव जुलियन

– कु. मधुरी अंबाडकर
बी.ए., भाग – ३

◆◆◆◆◆

## चारोळी



दिवसभर माझ्या नावाचा
ध्यास घेतेस
मी समोर आले की
मुक्यानेच ऐकतेस
सुख-दु:खांना जेथे
समजुन घेतले जाते
अनमोल त्या प्रेमनात्याला
मैत्री म्हटले जाते.

# कन्यादान

बाप आणि लेक हे नाते शब्दात मांडणे कठीण. बाबा हा शहाळ्यासारखा असतो. बाहेरुन कितीही कठोर असला तरी. आतून मात्र नितळ आणि मधूर पाण्याचा झरा असतो. कुठलीही मुलगी जर डोळे झाकून एखाद्या पुरुषावर विश्वास ठेवू शकते, तर तो फक्त तिच्या वडिलांवर. लेक जर घराचे सौख्य असेल तर त्या सौख्याचे पावित्र्य तिचा बाप असतो.

संस्कार देणारी आई असली, तरी ते संस्कार जपणारा बाबा असतो. संयम देणारी आई असली तरी खंबीर बनविणारा बाबाच असतो. बोट धरुन चालायला शिकविणारा बाबाच असतो.

लेकीच्या हट्टासाठी घोडा होणाराही बाबा असतो. कामावरुन येतांना रोज न चुकता खाऊ आणणाराही बाबाच असतो. पिकनिकसाठी पण पैसे बाबाच देतो. खरेदी करतांना आईने कमी किमतीचा ड्रेस काढला तर, हळूच लेकिला विचारुन भारी किमतीचा ड्रेस घेणारा सुध्दा बाबाच असतो. आईने काही काम सांगीतले तर तिला दटावणारासुध्दा बाबाच असतो. लेकिचे पहिले बोबडे बोल, तिने टाकलेले पहिले पाऊल, तिचे लाडीक वागणे, तिची घरभर पैंजनाची छुमछुम हे सगळे पाहून सुखावतो तो बाबा असतो आणि लेकिला नाजूक कळीसारखा सांभाळणारा आणि प्रसंगी रागे भरणारा पण बाबाच असतो; पण त्यात त्याची लेकीसाठीची तळमळ असते. तिच्यासाठी काळजी असते. लेकिच्या प्रत्येक सुखासाठी झटणाराही बाबाच असतो. मात्र शेवटी मुलगी म्हणजे परक्याचे धन हे कटू सत्य पचवणाराही बाबाच. ज्या लेकिला २०-२५ वर्षे जीवाच्या पलीकडे सांभाळले. तिला एका क्षणात परक्याच्या हातात देतांना त्याचे हृदय काय तुटत असेल याची कल्पनाही करता येणार नाही. आर्त धागे तुटल्याची ती वेदना कोणीच समजु नाही शकणार. आपल्या लेकिला माहेरचा उंबरठा ओलांडून सासरी जाताना पाहतांना ढसाढसा रडणाराही बाबाच असतो. आपल्या लेकिचा हात परक्याच्या हाती देताना आतुन तुटणारा बाबाच असतो.

दिल्या घरी सुखी रहा म्हणताना मनातून खचलेलाही बाबाच असतो.

असा हा बाबा त्याच्या लेकीचे सर्वस्व असतो. आणि फक्त लेकच तिच्या बाबाचे मन ओळखु शकते. लेकीच्या स्वतःपेक्षा जास्त विश्वास तिच्या बाबावर असतो. लग्नानंतर मुलीचे नाव जरी बदलले, तरी तिचे बाबाबरोबरचे नाते कधीच बदलत नाही. ती शेवटपर्यंत तिच्या बाबाची छोटी परीच असते. एक गोंडस परी लक्षात ठेवा.

मुलगा वारस आहे, मुलगी पारस आहे.
मुलगा वंश आहे, मुलगी अंश आहे
मुलगा आन आहे, मुलगी शान आहे
मुलगा तन आहे, मुलगी मन आहे
मुलगा संस्कार आहे, मुलगी संस्कृती आहे.
मुलगा आग आहे, मुलगी बाग आहे
मुलगा दवा आहे, मुलगी दुवा आहे
मुलगा भाग आहे, मुलगी सौभाग्य आहे.
मुलगा गीत आहे, मुलगी संगीत आहे

लेक वाचवा ! लेक वाढवा ! लेक घडवा ! हे सगळे करणारा तुझा बाप विशाल आहे. ज्यांना मुलगी नाही त्यांनी सुनेला जीव लावावा व आपल्या लेकीसारखा तिचा सांभाळ करावा हे सुध्दा म्हणणारा बाबाच आहे.

- कु. अर्चना ठाकरे
एम.ए., भाग -१

◆◆◆◆◆



# जीवन जगतांना

जीवन जगतांना
जगावं लागतं
वाह! नाही मिळाली
तरी पुढे सरकावं लागतं
दु:ख हसून गिळावं लागतं
डोळ्यातील आसवांना
गिळावं लागतं
प्रकाशातील किरणांना
चमकावंच लागतं
जीवनात घर करुन
जिंकावंच लागतं
जीवनात दु:ख असो की
सुख जीवनमात्र जगावंच लागतं
अंधाऱ्या रात्री
चांदण व्हायंच लागतं
माया मोह हा
सोडावाच लागतो
इच्छा असो की नसो
सर्वांनाच एक दिवस
मरावचं लागतं, मरावचं लागतं.



कु. मयुरी काष्टे
(बी.ए., भाग -२)

◆◆◆◆◆

# दुष्काळ

तु कोसळता ही रडवितो
न कोसळता ही रडवितो
ही कसली निसर्गाची करणी
बिया सकट फाटली धरणी ।
जगण्याचा आधार आमचा
उन्हात पोळुन करपला
कोळसा झाला पिकाचा ।।
सदा श्याप आम्हा दुष्काळाचा
धन धान्य वाहुन गेला
धनी बी फासावर मेला ।
या दुष्काळानं आमच्या
कित्येक पिढ्या नेल्या
बैलासकट नांगर नेला ।।
उचलुन सावकारानं
सासऱ्यालाही पिडलय आता
हृदय विकारानं ।।
सांत्वन देण्यापाई
आल्या कित्येक धरुन ताफा
आश्वासनाच्या मारल्या
त्यांनी नुसत्या पोकळ वाफा ।
कितीही शेतकरी मेला
सरकार सदा अपयशी
कधीच संपणार नाही का
आमच नात दुष्काळाशी ।।



कु. श्यामल फुंडे
(बी.ए., भाग -२)

# जुगार

पहिल्याच दिवशी वर्गामध्ये सरांचे आगमन झाले.
ओळखीचे सत्र सुरु करण्यात आले.
तुमचे नाव काय... ?
तुमचे गाव काय... ?
असे प्रश्न विचारण्यात आले...
कुणाचे बाबा वकील, डॉक्टर तर कुणाचे इंजिनिअर...
माझा नंबर येताच...
मी पटकन उभी राहिली व चटकन सांगितले
सर, माझे बाबा शेतकरी आहेत.
मी असं म्हणताच सगळा वर्ग हसायला लागला...
मला याचा फार राग आला...
मी म्हटले सर मी नाही म्हणत,
या साऱ्यांचा धंदा छोटा हाय,
पण,... या काळ्या आईची शपथ
सर... या साऱ्याहून
माझा बाप मोठा हाय...
हाडाची काडं करुन रात दिन राबत असतो,
तो राबतो म्हणून तुम्ही आम्ही दिसतो...
काड्या कुड्याचं जिन त्याचं पण,
साऱ्या जगाला भाकर देतो...
अन साऱ्या जगाला भाकर देणारा,
कधी कधी उपाशीच झोपतो
माहित नसतांना पाऊस येईल, नाही येईल,
हजारो रुपये मातीत गाळतो,
खरंच सर तो माती संग जुगारच खेळत असतो.
सगळे जण जगण्यासाठी जुगार खेळतात पण,
माझा बाप जगवण्यासाठी जुगार खेळतो.
अन्
या जगण्याच्या जुगारीमध्ये तो नेहमीच हरतो.
माणुसकीच्या गावामध्ये अजून त्याची वस्ती हाय,
खरंच सर माझ्या बापाची मरणा संग दोस्ती हाय...
फाटके तुटके कपडे सर
तो अजुनही अंगावर घालतो...,
पण,
सर मला तुमच्या कपड्याचाही
त्याच्याच घामाचा वास येतो.
टाकुन पहा मातीत सर तुम्ही
पाच-पन्नास हजार, तेव्हाच तुम्हाला कळेल,
त्याच्या जगण्याचा जुगार.
म्हणून,
म्हणते सर अभिमान हाय मला
माझा बाप शेतकरी असल्याचा
अभिमान आहे मला
मी या शेतकऱ्याची वारस असल्याचा
जग लिहीते आईसाठी,
जग लिहीते साऱ्यांसाठी पण,
मी लिहिते बापासाठी, त्याच्याच जीवनाचा ''जुगार...''
दारुचा स्टॉक संपत नाही
तंबाखू-सिगारेटचा स्टॉक संपत नाही
ऐवढच काय तर गुटका बंदी असुनही गुटक्याचा स्टॉक
कधी संपत नाही.
तर मग ऐन पेरणीच्या दिवसात खता-बियाण्यांचा
स्टॉक कसा काय संपतो... ?
आणि वाढीव पैसे देताच लगेच कसा काय उपलब्ध होतो...
दलाल व्यापाऱ्यांनो पुरे करा हा
हरामखोरपणा...
बस करा आता शेतकऱ्यांना लुबाडुन खाणं...
कारण,
ज्या दिवशी आम्हा शेतकऱ्यांचा
अन्नधान्याचा स्टॉक संपेल ना
तेव्हा तुम्हाला भिक पण मिळणार नाही.
कधी मोकळ्या आकाशाखाली तुमची कमाई
ठेवून बघा,
रात्रभर झोप नाही येणार.
विचार करा शेतकऱ्याच करा होत असेल !!



- कु. नम्रता सातव
(बी. ए. भाग - २ )

◆◆◆◆◆

# विचार...

मंदिरातील घंटेला आवाज नाही...
जोपर्यंत तुम्ही ती वाजवत नाही... !
कवितेला चाल नाही...,
जोपर्यंत तुम्ही ती गात नाही...!!
त्याचप्रमाणे तुमच्या भावनांना सुध्दा किंमत नाही...,
जोपर्यंत तुम्ही त्या व्यक्त करत नाही...!!!
मन वळू नये, अशी श्रध्दा हवी...
निष्ठा ढळू नये, अशी भक्ती हवी...
सामर्थ्य संपू नये, अशी शक्ती हवी...
कधी विसरु नये अशी नाती हवी...

- कु. निवेदीता धनविज
कु. शिल्पा महानुर

◆◆◆◆◆

# शिवबा

अंधार फार झाला
आता दिवा पाहिजे
मराठी जनतेला आता
जिजाऊंचा शिवा पाहीजे

नेते झाले मस्तवाल
पिचली दुबळी जनता
मस्ती यांची जिरवायला
आता युवा पाहिजे

कसे जाहले कणाहिन
अन् पैशाचे भक्त
यांच्या डामडौलासाठी आटते
गोर गरिबांचे रक्त

तर
संघर्षाची वादळी हवा पाहिजे
लाचारांच्या फौजेपुढे उभा ठाकणारा
बाणेदार मराठी युवा पाहिजे
म्हणुनच आता आम्हाला जिजाऊंचा
शिवा पाहिजे.



कु. प्रांजली वाणके
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆

# आईचे सौभाग्य

बाप माझा करायचा हमाली
येताना मात्र दारु प्यायचा
दारु पिऊन माझा बाप
कुठंतरी झोपून घ्यायचा

जर आला कधी घरी
तर माय बडबड करायची
बापाने रागात मारल्यावर
ती एकटी रडायची

करायची धुनीभांडी लोकांची
आमच्यासाठी राबायची
राहून माझी माय स्वत: उपाशी
आम्हाला मात्र खाऊ घालायची

बाप आला घरी की
सर्वांना मारुन जायचा
बाहेर जाऊन तोच बाप
दारु पिऊन गटारात पडायचा

कमी पडली दारु एकदा
आईचं मंगळसुत्र मागितलं
आईने नाकारले म्हणून
त्याने ते ओढून घेतलं

आई लागली रडायला माझी
रक्त तिच निघतं होतं
त्रास होत होता मनाला
म्हने त्यात माझं सौभाग्य होतं

प्रश्न पडतो मनाला माझ्या
आई का अशी बोलली
होत फक्त मंगळसुत्र म्हणून
एवढी का बरं रडली

आता कळत आहे जग मला
म्हणून दु:ख आईचं जानवलं
आठवेल आईचे अश्रू आज
म्हणून डोळ माझं पानावलं



- कु. मनिषा उईके
(बी. ए. भाग -३)

◆◆◆◆◆

# माय



अज्ञानाच्या या जगाला
उजेड तू दाखविला
ज्याच्या दारी शिक्षण
त्यानाच तू घडविला
मग गरीब असो वा श्रीमंत
तू सगळ्यांना दाखविली
ज्ञानाची साया
म्हणून तर तुला म्हणतात
जगातील शिक्षणाची सावित्री माया.

◆◆◆◆◆



# उमलु द्या त्या कळीला

ती भयाण वादळी रात्र
आणि ती अघोरी हवा
कोणी बरे विझवला
तो थिमणासा दिवा ।। १ ।।

होत राहिली अशीच 'स्त्री भृणहत्या'
तर मिळेल कशी आई प्रेम देणारी
लाभेल का प्रेमळ बहिण आणि पत्नी
अन् आजी रोज गोष्ट सांगणारी ।। २ ।।

'मुलगा-मुलगी समान' हा नारा
आज प्रत्येक जण देतोच आहे
पण वर्तमानाची स्थिती पाहता
मुलीचे प्रमाण घटतेच आहे ।। ३ ।।

उमलु द्या त्या कळीला
तिला अजुन जग पाहायच
व फुलपाखरा मागे पळतांना
तिला हळुहळु फुलायचं ।। ४ ।।

का मारता तिला मातेच्या गर्भात
कारण ती एक मुलगी आहे
जरा भुतकाळ तपासुन पहा
स्त्रीच जीवनाची शिल्पकार आहे ।। ५ ।।




जन्मु द्या त्या चिमुकलीला
सार्थक या जन्माचे होईल
पहाल तुम्ही, हिच चिमुरडी
एक दिवस आकाशी भरारी घेईल ।। ६ ।।

- कु. शितल चवडे
(बी. ए. भाग -३ )

◆◆◆◆◆

# बाप

बाप माझा कष्टकरी
भोळा सुदाम दिसतो
दु:ख गिळून अंतरी
सदा खुशीत असतो ।

माथा टेकून पायाशी
बाप चिंतेत बसतो
विठूराया पंढरीचा
त्याच्या मनात वसतो ।

दु:ख बांधून उराशी
बाप खुशीत निजतो
सुर्य येता डोईवरी
पुन्हा घामात भिजतो ।

काळ्या काळ्या मातीसंग
त्याचं मनही रुजतं
आटवून रगताला
शेतशिवार सजतं ।

पायी जाऊन वारिला
बाप स्मरे विठोबाला
देवा पाठव पाऊस
साद विठू चरणाला ।



बाप झटतो नेटाने
कधी दुखवत नाही
त्याचं मोल अनमोल
कुणा आठवत नाही ।

आई सारखाच बाप
घरासाठीच झटतो
आईचं नाव पुढे पुढे
बाप मागेच भेटतो।।

- कु. सुवर्णा सलामे
(बी. ए., भाग -३)

◆◆◆◆◆

## सावित्रीची गौरव गाथा

शाहू, कबीर, ज्योतिबा झाले महान भूवर
त्यात सावित्रीबाई जशी दुधात साखर ।। धृ ।।
पती लाभले ज्योतिबा
तीची पुण्याई मोठी
त्याने, शिकविले ज्ञान
तीने केली गं क्रांती ।। १ ।।
    तीने घेतला वसा
    मुलींना साक्षर बनण्याचा
    तीने घेतला ध्यास
    मुलीची प्रगती करण्याचा
तीचा ज्ञानाचा मार्ग
साऱ्या जगात चमकतो
आजची नारी झाली गं
आजची नारी झाली गं.
राष्ट्रपती पंतप्रधान गं
    तीची पुण्याई थोर
    आहे समान अधिकार
    तीचे गुण गाता पुरे
    आहे अफाट उपकार



- कु. राखी पवार
(बी. ए., भाग - ३)

◆◆◆◆◆

## दोन शब्द जगण्यासाठी

कुणाला आपला कंटाळा येईल
इतकं जवळ जावू नये.
    चांगूल पणाचे ओझे वाटेल.
    इतके चांगले वागू नये.
कुणाला गरज नसेल आपली
तिथे रेंगाळत राहू नये.
    नशीबाने जुळलेली नाती जपावी
    पण स्वत:हून तोडू नये.
गोड बोलणे गोड वागणे
कुणास अवघड वाटू नये
    जवळपणाचे बंधन होईल
    इतके जवळचे होऊच नये.
सहजच विसरुन जाणे सारे
सल मनात जपू नये.
    नकोसे होऊ आपण
    इतके आयुष्य जगूच नये
हवे हवेसे असतो तेव्हाच
पटकन दूर निघून जावे.
    आपले नाव दुसऱ्याच्या ओठी
    राहील इतकेच करुन जावे.



- कु. अंकिता मडावी
(बी. ए., भाग - २)

◆◆◆◆◆



## अनाथ

ओलावले माझे डोळे,
झाल्या पापण्या बोजड
किती आवरतो परि,
मज आवरे ना रड.
    उभ्या जगाच्या गर्दीत,
    रोज शोधतो मी तुला
    भेट निदान एकदा,
    तुझ्या टाकलेल्या लेकराला
दिले टाकून गं मला,
केरकचऱ्या समान
भला माणूस गं. कोणी,
दिले मला जीवदान
    मी जाणतो गं माये,
    तुझ्या मेल्या मनाच्या यातना
    का शिक्षा मला अशी,
    काय केला गं मी गुन्हा
तुटे तीळ तीळ जीव,
वाटे कुशीत शिरावे
अनात म्हणोनी ना मला,
कधी कुणी हिनवावे
    कुण्या हैवानाने माये,
    तुला मातृत्व लादले
    का फुलण्याच्या आधी,
    फुल खुडून टाकले.
नको टाकू गं तू अशी,
माये तू पोटच्या लेकराला
न पडो तुजवीन जिणे,
कुण्या तान्हुल्या बालकाला ।

- कु. रजनी मडावी
(बी. ए., भाग -३)

◆◆◆◆◆

## काट्ट

कविता जुळवणं जरी
असला शब्दांचा खेळ
तरी कविताच जुळवते
अनोळखे मनांचे मेळ...
    ते शब्द आपुलेसे वाटतात
    अन् डोळ्यासमोर आठवणी साचतात...
    काट्याच्या रुपाने नजर
    शोधू लागते प्रसंग
    एकरुप होऊन त्या काट्याशी
    आठवणीचे उमटू लागतात तरंग...
जे बोलू शकत नाही
ते उमटवते शाई
कारण काट्याशिवाय माझ्याकडे
पर्यायच उरत नाही.

- कु. रजनी मडावी
(बी. ए., भाग -३)

◆◆◆◆◆

## चारोळी

विस्कटलेल्या नात्यांना जोडायला
प्रेमाची गरज भासते
विखुरलेल्या माणसांना शोधायला
विश्वासाची साथ लागते
प्रत्येकाच्या जीवनात येतात वेगवेगळी
माणसं पण पाहिजे ती व्यक्ती
भेटायला मात्र नशिबचं लागते.

- कु. साधना मरापे
(बी. ए., भाग -२)

## माझा महाराष्ट्र

राज्यामध्ये महाराष्ट्र, महाराष्ट्र असे महान
या महान राष्ट्राचे आम्ही गातो गुणगान

फुले, टिळक, आगरकर इथे जन्मले लाल
स्वातंत्र्यासाठी त्यांनी भोगिले किती हाल

गिरीवरती सुंदर लेणी, मंदिरे कृष्ण पाषाणी
तुकड्याची अभंगवाणी, लतादिदींची मंजूळ गाणी

आनंदीबाई जोशी पहिल्या महिला डॉक्टर
कृष्णा पाटील ने केले शिखर एव्हरेस्ट सर

भीमा, कृष्णा, गोदावरी अन् उत्तुंग सह्यागिरी
या राज्याची राजधानी माझी मुंबई नगरी.

डफाच्या थापेवरती गर्जे शिवबाचा पोवाडा
जाखडी अन् लावणीने सारा देश झाला वेडा.



कु. निवेदिता धनवीज
(बी. ए., भाग १)

## त्याला रडवते भाकर

जगाचा पोशिंदाच इथे आहे बनला चाकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर ... !

पिकवतो जो धान्य त्याला मिळेल हो अन्न
कर्जापायी चेहरा दिसतो उदास अन् खिन्न
पिकवतो कापूस त्याचा घरी दिसेना चाकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर... !

वावभर जागा असो घाम गळतो शेतात
निसर्ग रुसतो तेव्हा काही मिळेना हातात
शासनाला वाटे तो जसा सर्कशीचा जोकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर...!

जरी मालकीचे शेत त्याच्या हातामंदी नाही
त्यास आपल्या पिकाले भाव देता येत नाही
जीव फासाला टांगला तो ठरल्यावर नोकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर... !

त्याचे उघडे नागडे आहे उपाशी लेकरं
दलालाचे गुबरे ढोरं देती खाऊन ढेकरं
याचा रिकामाच खिसा त्याचा भरे लॉकर
वीतभर पोटासाठी त्याला रडवते भाकर...!



कु. प्रगती ठोंबरे
(बी. ए., भाग ३)



## लोकशाही

सुखी झाला इंडिया
दु:खी राहिला भारत
एका पेक्षा एक आयडिया
कुपोषितांच्या दारात
रोज नव्या एका प्रश्नाची
भारतात निघते वरात
पुढाऱ्यांची मजाच मजा
समस्त गरिबांच्या घरात
२५ कोटीसाठी विकतात आपले इमान
जिथे आपलाच झाला बेईमान
तिथे आता काय होणार ?
शिक्षण घेण्यासाठी चालू झाली सट्टेबाजी
खेड्यातील लेकर या जन्मात तरी
जिंकणार नाही ही बाजी
काय राहिलं महाग व्हायचं
कठिण होते घेणं भाजी
आमच्या वेळी घेणं भाजी
म्हणतात असे दाजी
कशाला लोकशाही दिन
दुबळ्याचे होतात हाल
बस झाल भारतवासीयांनो
हाती घ्या आता मशाल
आता हाती घ्या मशाल.



- कु. योगिता वानखडे
बी.ए., भाग - २

◆◆◆◆◆

## माझी माय

जशी चिमणी पिल्लांना, भरविते घास ।
तशी माझी माय, आहे जगाहूनी खास ।। धृ ।।

स्वत: राहून उपाशी, आम्ही भरविला घास ।
चिमटा पोटाले घेवून, नाही होवू दिला भास ।। १ ।।

झेलुनिया माऊलीने, ऊन पावसाचं वार ।
जग दाखविण्यासाठी तिने केलं लहानाचं थोर ।। २ ।।

स्वत:साठी तीने कधी, बांधिला न निवारा ।
आम्हा सर्वांना दाखविले तिने सागर किनारा ।। ३ ।।

पहा उपकार तिचे, मी फेडू आता कसे ।
हिच खंत माझ्या, ध्यानी मनी असे ।। ४ ।।

धनी असो वा निर्धन, जगा मिळेल सर्व सुख ।
माऊलीच्या माये विना, आहे अपूर्ण ते सुख ।। ५ ।।

माये ये गं तु परतुनी तुझी पाहते गं वाट ।
तुझ्या संगे बोलायला, माझे आतुर आम्हचे गं ओठ ।।



- कु. अंजू [illegible]
बी.ए., भाग - २

◆◆◆◆◆

## अर्जुनाचा श्रीकृष्णाला प्रश्न

''केशवा जर 'मृत्यु' सगळ्यांना येणार असेल तर हे भजन, किर्तन, पूजा-अर्चा हा सत्संग कशाला?''

''जो मनुष्य मौज-मस्ती करतोय त्यालाही मृत्यु येणारच आहे. आणि जो सत्संग करतोय त्यालाही...''

श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितल :-

पार्था,

''मांजर जेव्हा उंदराला पकडते तेव्हा ती उंदराला दाताने मारुन टाकून, खाऊन टाकते. पण तीच मांजर जेव्हा त्याच दाताने आपल्या पिल्लांना पकडते तेव्हा त्यांना खात नाहीत. उलट खूप नाजूक पध्दतीने त्यांना एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर घेऊन जाते. दात पण तेच आहेत, तोंडी तेच आहे. फक्त परिणाम वेगवेगळे आहेत...''

''तसेच मृत्यु एक आहे, पण एक प्रभूच्या चरणामध्ये विलीन होईल.
तर दुसरा ८४ फेऱ्यामध्ये अडकेल...''



- कु. पल्लवी डंबारे
(बी. ए., भाग -२)

◆◆◆◆◆

## हे असं कसं चालणार ?

आत्महत्या करतोय आम्ही
जबाब पण विचारतोय आम्ही
हे असं कसं चालणार ?
हे असं कसं चालणार ?
बँकेतून कर्ज काढतोय आम्ही
त्याची विल्हेवाट करतोय आम्ही
शेतीसाठी केला ? की पिण्यासाठी केला
याचा विचार केलाय का आम्ही
हे असं कसं चालणार ?
हे असं कसं चालणार ?
कर्ज काढताना बँकेत शंभर फेऱ्या मारतोय आम्ही
नंतर कर्ज फेडतांना विचार करतोय आम्ही
अगदी सोपा आणि साधा विचार केलाय आम्ही
विहीरीत उडी मारतो किंवा गळफास घेतोय आम्ही
तरी पण जबाब विचारतोय आम्ही
हे असं कसं चालणार ?
हे असं कसं चालणार ?
वडील माणसं म्हणतात, ''कर्ज काढू नका तुम्ही
परंतु त्यांचं ऐकताय का कुणी ?
फुकटचा पैसा खातोय आम्ही
म्हणूनच आत्महत्या करतोय आम्ही
तरी पण जबाब विचारतोय आम्ही
हे असं कसं चालणार ?
हे असं कसं चालणार ?



- कु. प्रिया मते
(बी. ए., भाग -२)

◆◆◆◆◆



## आयुष्याला द्यावे उत्तर

असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे
लावून उत्तर...
नजर रोखूनी नजरेमध्ये, आयुष्याला
द्यावे उत्तर...
नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी
ताऱ्यांची...
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी
स्वप्नांची...
असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला
मिळती सतत...
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला
द्यावे उत्तर...
पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर
घेताना...
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून
देताना...
संकटासही ठणकावून सांगावे, आता
ये बेहत्तर...
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला
द्यावे उत्तर...
करुन जावे असेही काही, दुनियेतुनी
या जाताना...
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप
शेवटचा देताना
स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर
व्हावा कातर-कातर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला
द्यावे उत्तर...

- कु. मोहिनी चव्हाण
(बी. ए., भाग -१)

## बाबा

आईचं गुणगान खूप झाले,
पण बिचाऱ्या बापाने काय केले.
बिकट प्रसंगी बापच सदा सोबती,
आपण फक्त गातो आईचीच गोडवी
आईकडे असतील अश्रूंचे पाट.
तर बाप म्हणजे संयमाचा घाट
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई,
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही.
देवकी-यशोदेचं प्रेम मनात साठवा, टोपलीतून बाळास
नेणारा वासुदेवही आठवा.
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत,
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ.
काटकसर करुन मुलास देतो पॉकिटमनी,
आपण मात्र वापरी शर्ट-पॅन्ट जुनी.
मुलीला हवे ब्युटीपार्लर, नवी साडी,
घरी बाप आटपतो बिन साबणाची दाढी.
वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न,
बापाला दिसे मुलांचे शिक्षण, पोरीचे लग्न.
मुलाच्या नोकरीसाठी जिवा तोडून लागते धाव,
आठवा मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप.
जीवनभर मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा,
त्यांनी समजून घ्यावं हीच माफक इच्छा.



- कु. [illegible]
(बी. ए., भाग -१)

◆◆◆◆◆

# साद आईची

महिने मागून महिने
शेवटी वर्ष सरुन जाते
वृध्दाश्रमाच्या पायरीवर
वाट तुझी पाहाते...

भिजून जातो पदर
अन मन रिते राहाते
कधी कधी मात्र
तुझी मनीऑर्डर येते...

पैसे नकोत यावेळी
तूच येऊन जा
बाळा मला तुझ्या,
घरी घेऊन जा...

तुझा बा होता तोवर
काळ बरा गेला
तुझी आठवण काढत,
उघड्या डोळ्यांनी गेला...

शेवटपर्यंत सांगत होता,
लेक माझा मला
तू मोठा साहेब,
त्याचं मोठं कौतूक त्याला...

माझ्याही हृदयात फोटो,
तुझा तू पाहून जा
बाळा मला तुझ्या
घरी घेऊन जा...



दुष्काळाच्या साली
जन्म तुझा झाला
तुझ्या दुधासाठी
आम्ही चहा सोडून दिला...

वर्षाकाठी एक कपडा,
पुरवून-पुरवून घातला
सालं घातली बापाने,
पण तुला शाळेमधी घातला...

हयं तर तू हे,
सगळं विसरुन जा
पण बाळा मला,
तुझ्या घरी घेऊन जा...

धुणी-भांडी करीन मी,
केरकचरा भरीन मी
पुरणपोळ्या, आलुवड्या
तुझ्यासाठी रांधीन मी...

नातवंडाच दुखलं-खुपलं,
सगळं बघेन मी
घाबरु नकोस त्याची आजी
असं नाही सांगणार मी...

तुझ्या घरची कामवाली,
म्हणून घेऊन जा
पण बाळा मला
तुझ्या घरी घेऊन जा...

थकलेले रे डोळे बाळा
प्राण कंठी आले
तुझ्याविणा जगणे
आता मुश्किल झाले...

विसरु कशी तुला मी,
तुझ्यासाठी आई झाले
बाळ माझं ''कुलभूषण''
पोरकी मी का झाले ?...

आता माझ्या थडग्यापाशी
''आई'' म्हणून जा
जमलच तुझ्या तर
वृध्दाश्रम पाहून जा...

- कु. अस्मिता पाटील
(बी. ए., भाग -२)

◆◆◆◆◆

# मैत्री म्हणजे काय

आपल्या सारख्या विचारांच्या व्यक्तीची साथ मिळणे
म्हणजे मैत्री, खऱ्या मैत्रीत कशाचीही पर्वा न करता
एकमेकांना मदत केली जाते. वय, जात, वर्ण
या सर्व भेदाच्या पलीकडे जाऊन मैत्री होत असते.
खरा मित्र किंवा मैत्रीण तुम्हाला समजून घेतात
आणि खऱ्या मैत्रीत कुठलीच अपेक्षाही नसते.
मैत्री ही आई, प्राणी, पक्षी, मुलगा, मुलगी
कुणाशीही होवू शकते.
स्वत:शी नव्हे तर मनाशी जुळलेले नाते
म्हणजे मैत्री असते.



कु. साधना मरापे
(बी. ए., भाग २)

# स्वप्नच हरवून बसलो

जिंकण्यासाठी आयुष्यात, स्वप्नांच्या मागे धावलो
पण शेवटी मात्र माझे, स्वप्नच हरवून बसलो ।। १ ।।

मागे वळुन बघितले, खूप दूर आलो होतो
माझे कुणीच नव्हते, पैसाच पैसा होता
या पैशाच्या पावसात माणूस हरवून बसलो
शेवटी मात्र माझे, स्वप्नच हरवून बसलो ।। २ ।।

आवडतं तेव्हा लहान पण माझं
दारिद्र्याच्याही ओंजळीत समाधान होतं.
आज खेळणारेही नव्हतेच, हसणारेही नव्हते
हे सारही घे तुझं, पण बालपन दे माझं
ते आठवून पुन्हा, ढसाढसा रडत बसलो
शेवटी मात्र माझे, स्वप्नच हरवून बसलो ।। ३ ।।

ऐश्वर्याच्या सुखासाठी, अपार झिजलो होतो
आज गाडीही होती, माडीही होती
पण अकाल होता, आनंदाचा, समाधानाचा
या आनंदाच्या नादात, आनंदच गमावून बसलो
शेवटी मात्र माझे, स्वप्नच हरवून बसलो ।। ४ ।।

आज कुणीच नव्हते माझे, मरणाच्या दारात होतो
सारा पैसा पेटवून
माझी माती, माझी माणसं शोधत बसलो
शेवटी मात्र माझे, स्वपन्नच हरवून बसलो ।। ५ ।।



